अभिसरण
ISSN 2229-4856

# नव्वदोत्तर मराठी साहित्य

## चर्चा आणि मीमांसा

संपादक
प्राचार्य डॉ. वसंत सानप

कार्यकारी संपादक
डॉ. गणेश मोहिते

सहसंपादक
डॉ. मनोहर सिरसाट

नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा । अभिसरण - विशेषांक मे २०२२

Scanned with CamScanner

# ॥ अभिसरण ॥

Special Issue : May- 2022 ISSN : 2229-4856

# नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा

: मुख्य संपादक :

प्राचार्य डॉ. वसंत सानप

कार्यकारी संपादक : डॉ. गणेश मोहिते

सह संपादक : प्रो. डॉ. मनोहर सिरसाट

: संपादक मंडळ सदस्य :

डॉ. बाबासाहेब कोकाटे
डॉ. रवींद्र काळे
डॉ. सुरेश घुमटकर
डॉ. बापू जाधवर
डॉ. शैलेश आकुलवार
प्रा. महारुद्र जगताप
प्रा. माणिक भताने
डॉ. ईश्वर छानवाल
प्रा. संदीप परदेशी

: सल्लागार समिती :

डॉ. लक्ष्मीकांत देशमुख
अध्यक्ष, ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बडोदा

डॉ. ताहेर पठाण,
मराठी विभाग प्रमुख, अलीगढ मुस्लिम विद्यापीठ, अलीगढ (उत्तरप्रदेश)

डॉ. पृथ्वीराज तौर
मराठी विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डॉ. सुधाकर शेंडगे,
प्रोफेसर, हिंदी विभाग, डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. रावसाहेब जाधव,
प्राचार्य, पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रो. आनंद उबाळे
इंग्रजी विभाग, डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. शाम सिरसाठ,
प्रकुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. प्रकाश पवार,
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. अक्षय सरोदे
इंग्रजी विभाग, डॉ. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. सय्यद अझरुद्दीन,
वाणिज्य विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (वाणिज्य)

डॉ. अण्णासाहेब गुरव
अधिष्ठाता (वाणिज्य), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. संतोष दास्ताने
समन्वयक, अर्थशास्त्र, विश्वकोश, निर्मिती मंडळ

* अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेल असे नाही.

Scanned with CamScanner

ISSN 2229-4856

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | लेखकाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | झुंज तिची पाचटाशी मधील जीवन संघर्ष | प्रा.डॉ.रामनाथ वाढे | ०१ |
| ०२ | नव्वदोत्तरी कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरी | प्रा. डॉ. देशमुख बिभीषण | ०५ |
| ०३ | लक्ष्मीकांत देशमुख एक वास्तववादी लेखक ('नंबर वन' क्रिडा क्षेत्रातील वास्तव) | किशोर बाबुराव भगत | १२ |
| ०४ | 'खेळ'चे नव्वदोत्तर काळात साहित्याच्या अभिवृद्धीतील योगदान | प्रा.डॉ.महादेव अंगद जगताप | १५ |
| ०५ | समकालीन जीवन जाणिवांचा सशक्त वास्तववादी आविष्कार करणारी नव्वदोत्तर मराठवाडी ग्रामीण कविता | प्रा .डॉ . राजकुमार किशनराव यल्लावाड | २० |
| ०६ | "प्रेरक ललकारी या नव्वदोत्तर नियतकालिकाचे वाङ:मयीन व सामाजिक योगदान" | डॉ विनोद वासुदेव उपर्वट | २६ |
| ०७ | नव्वदोत्तर मराठी कवितेतील कृषी वेदना व विद्रोहाच्या पाऊलखुणा | डॉ. ज्ञानदेव राऊत | ३२ |
| ०८ | दलित कविता आणि कविवर्य वामन निंबाळकर | प्रो.डॉ.मनोहर सिरसाट<br>मीना अशोक अंभोरे | ४० |
| ०९ | नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कथाः स्थिती आणि गती | डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक | ४७ |
| १० | नव्वदोत्तर मराठी महानगरीय कवींच्या कवितांमधून आविष्कृत होणारी आशयसूत्रे | प्रा. प्रवीण सदानंद गायकर | ५३ |
| ११ | नव्वदोत्तर ग्रामीण कविता | प्रा. दिलीप ज्ञानोबा भिसे | ५९ |
| १२ | स्त्रीवादी साहित्य प्रवाहातील आंबेडकरी स्त्रीवाद: नवसाहित्य प्रवाहाच्या निमित्ताने | डा. रेखा कचरूजी मेश्राम | ६४ |
| १३ | नव्वदोत्तर मराठवाड्यातील ग्रामीण कविता : एक दृष्टिक्षेप | सौ.सारिका सूर्यकांत नरवडे | ६९ |
| १४ | नव्वदोत्तर मराठवाड्यातील ग्रामीण कथालेखन : स्वरूप आणि विशेष | श्रीमती.बालिका दगडू भागवत | ७४ |
| १५ | नव्वदोत्तर मराठी कविता : एक आढावा | प्रा.डॉ. सुनील मधुकर पवार | ७९ |
| १६ | समकालीन समाजवास्तव आणि मराठी कविता. (जागतिकीकारणाच्या विशेष संदर्भाने) | प्रा. विद्या सुर्वे बोरसे | ८६ |
| १७ | उमेश मोहिते यांचे भाकरी आणि कर्म आणि नव्वदोत्तर मराठी साहित्य | प्रा.डॉ. सोपान सुरवसे<br>प्रा.व्यंकटेश संजय राऊत | ९२ |
| १८ | नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी | डॉ. बबन सिद्राम गायकवाड | ९५ |
| १९ | उत्खनन कादंबरीचे वेगळेपण | प्रा. डॉ. शिवाजी तुकाराम पाटील | ९८ |


Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २० | 'आले ढग... गेले ढग' मधील सामाजिक प्रश्न | डॉ. एम.ए.कव्हळे | १०१ |
| २१ | कृषिव्यवस्थेतील वर्तमान वास्तव : 'या परावलंबी दिवसात' | डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे | १०४ |
| २२ | साहित्यकृती आणि चित्रपट निर्मिती | प्रा.डॉ.धोंडगे एम.बी.<br>कांदे केशव अंगदराव | १०९ |
| २३ | चरित्र -आत्मचरित्र : स्वरूप व संकल्पना | डॉ. सुनीता अंबादास बोराडे | ११२ |
| २४ | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितेला दिशा देणारी कविता: पिढीपेस्तरप्यादेमात | प्रा.बाळू मोहन तिखे | ११६ |
| २५ | "लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातून चित्रीत झालेले राजकीय वास्तव" | प्रा. संदीप परदेशी | १२० |
| २६ | लोककला तमाशाचे बदलते स्वरूप | तुकाराम हरिश्चंद्र देवकर<br>प्रो. एम. बी. धोंडगे | १२४ |
| २७ | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा | प्रा. लक्ष्मण गित्ते | १२७ |
| २८ | स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीत्वाचे दर्शन | कैलास मच्छिंद्रनाथ होके<br>प्रा.डॉ. बाळासाहेब जाधव | १३१ |
| २९ | जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी दलित कथा | प्रा.डॉ. संजय राजधर महाले | १३६ |
| ३० | 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी' (विशेष संदर्भ : 'साखरफेरा') | प्रा. महारूद्र सूर्यभान जगताप | १४२ |
| ३१ | दलित जाणिवा शब्दांकित करणारी निसर्गार्कीत कविता : मोहाडी | प्रा.डॉ.प्रल्हाद दत्तराव भोपे | १४६ |
| ३२ | प्रा. वामन निंबाळकर : मूल्याधिष्ठित जाणिवा आविष्कृत करणारा मोठा कथालेखक | प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट | १५२ |
| ३३ | मानवी प्राक्तन शब्दबद्ध करणारी कविता- काळी माती निळे आभाळ | डॉ. गणेश मोहिते | १५५ |
| ३४ | मार्ग कादंबरीतील पर्यावरणवादी विचार | प्रा.सौ. विलिना इनामदार | १६० |
| ३५ | "1990 नंतरच्या कथेचा अभ्यास" | प्रा. डॉ. शंकर शिवाजी मुंडे | १६९ |
| ३६ | मोतीराज राठोड यांच्या वैचारिक साहित्यातील विमुक्तांचे जीवनमूल्ये | डॉ. आकाश ब. पवार | १७४ |


Scanned with CamScanner

ISSN 2229-4856

# नव्वदोत्तरी मराठवाड्यातील ग्रामीण साहित्य – विशेष संदर्भ: भास्कर चंदनशिव व आसाराम लोमटे

**श्री काजगुंडे हनुमंत महादेव**
संशोधक विद्यार्थी
मो.९५६११४०७४२

**प्रस्ताविक:**

1990 नंतर जागतिकीकरण व उदात्तीकरणाचे वारे वेगाने वाहत आहे. तरीदेखील शेतकऱ्यांचे जगणे पूर्वीपेक्षा अधिकच असाह्य होत चालले आहे. शेतकऱ्यावर संकटे तशी नेहमीच येतात परंतु आत्महत्या करण्याची लाट मात्र नवी आहे. शेती आणि शेतकरी यांचा जसा जवळचा संबंध आहे तसाच कर्ज आणि आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे. शेतीचे औद्योगिकीकरण आणि ग्रामीण भागाचे होणारे शहरीकरण यामुळे शेतकऱ्याची अवस्था 'सँडविच' सारखी झालेली आहे. बदलत्या काळासोबत धावताना शेतकऱ्याची दमछाक होताना पाहायला मिळते.

महाराष्ट्रातील शेतकरी हा शेती व्यवसायाशी निगडित आहे. शेती हा त्याचा मुख्य व्यवसाय आहे. शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाचा लहरीपणा, पाणी पुरवठ्याचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, भांडवलाचा अभाव यामुळे शेती तोट्यात जाते. शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेल्या मालाला योग्य भाव मिळत नाही. उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी केलेला खर्च मिळणाऱ्या उत्पादनातूनही निघत नाही. त्यामुळे शेतकरी दरिद्री, कंगाल बनला आहे. शेती व्यवसायात वारंवार येणाऱ्या अपयशामुळे तो कायम कर्जात बुडत चालला आहे. साधनांचा असमतोल, सामाजिक असमतोल, आर्थिक शोषण या कारणाने व्याकूळ झालेला शेतकरी गळफास जवळ करत आहे. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात महात्मा फुले यांनी लिहून ठेवले की, 'शेतकरी हा कर्जातच जन्म घेतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो.' स्वातंत्र्यपूर्वकाळापासून महात्मा फुले यांनी, शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यास सुरुवात करून समर्पित वृत्तीने विरोधी शक्तींना प्रखर झुंज देऊन शेतकरी प्रश्नाविषयी जागृती केली. महात्मा फुले यांचे विचार व त्यानंतरच्या ग्रामीण कथाकारांनी चित्रित केलेले शेतकरी जीवन आपल्या कथामधून प्रकाश झोतात आणले. त्यामध्ये आनंद यादव, रा. रं. बोराडे, दत्ता भोसले, चंद्रकुमार नलगे अशा अनेक कथाकारांनी शेतकरी जीवनाचे चित्रन केले आहे.

Scanned with CamScanner

1990 नंतरच्या ग्रामीण कथाकारांमध्ये मराठवाड्यातील भास्कर चंदनशिव, आसाराम लोमटे, श्रीराम गुंदेकर, भास्कर जाधव अशा विविध कथाकारांचे साहित्यात पडलेले प्रतिबिंब व त्यांचे ग्रामीण कथेतील शेतकरी जीवनाचे चित्रण याचा चिकित्सक अभ्यास करणे मला महत्वाचे वाटले म्हणून मी 'नव्वदोत्तरी मराठवाड्यातील ग्रामीण साहित्य विशेष संदर्भ: भास्कर चंदनशिव व आसाराम लोमटे' हा विषय संशोधन अभ्यासास घेतला.

**ग्रामीण कथेचे स्वरूप :**

कथा सांगणे, ऐकणे व वाचणे ही मानवाची सहज, स्वाभाविक आवड आहे. कथा हा प्रकार पुरातन काळापासून विकसित होत आला आहे. कथेचा उगम, विकास शोधणे तसे कठीणच आहे. परंतु आदिम काळापासून कथेचे अस्तित्व दिसते. तिचे स्वरूप वेगवेगळे असेल परंतु जगातील विविध भाषांमधील साहित्य हे कथात्मक असल्याचे दिसते. मानवी गरजेतून पिढ्यानपिढ्या सर्व सामाजिक स्तरांमधून कथा वावरत असताना आपल्याला दिसतात. ग्रामीण भागातील चित्रण ग्रामीण कथेच्या माध्यमातून समाजासमोर आलेले आपणास दिसून येते. मराठवाड्यातील अनेक नामवंत कथाकारांनी आपल्या लेखणीतून आपल्या कथेतून शेतकऱ्याचे असे वास्तविक चित्रण मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यामध्ये भास्कर चंदनशिव, आसाराम लोमटे यांनी मराठवाड्यातील शेतकऱ्याचे चित्रण अतिशय प्रभावीपणे मांडले आहे.

**भास्कर चंदनशिव:**

साठोत्तरी ग्रामीण कथेतील महत्त्वाचे ग्रामीण कथाकार म्हणून भास्कर चंदनशिव यांना आपण ओळखतो. त्यांची पहिली कथा 'कुस्ती', अंजली, या नावाच्या वार्षिक अंकांमधून प्रसिद्ध झाली पण त्यांच्या लेखनाला खऱ्या अर्थाने आरंभ व प्रेरणा, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना 'अस्मितादर्श' च्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या नावे एक दलित कथा स्पर्धा मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद येथे आयोजित केली होती. येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कथा स्पर्धेला त्यांनी पाठवलेल्या 'मसनवाटा' या कथेपासून झाली. त्यांचे 'जांवळढव' (1980) 'मरणकळा' (1983) 'अंगारमाती' (1991) 'नवी वारुळ' (1992) इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. या कालखंडातील साहित्याचे नेतृत्व भास्कर चंदनशिव यांच्याकडे द्यावे लागते. 1990 नंतर चा कालखंड हा ग्रामीण साहित्य चळवळीचा कालखंड आहे. कारण या कालखंडातील



Scanned with CamScanner

1990 नंतरच्या ग्रामीण कथाकारांमध्ये मराठवाड्यातील भास्कर चंदनशिव, आसाराम लोमटे, श्रीराम गुंदेकर, भास्कर जाधव अशा विविध कथाकारांचे साहित्यात पडलेले प्रतिबिंब व त्यांचे ग्रामीण कथेतील शेतकरी जीवनाचे चित्रण याचा चिकित्सक अभ्यास करणे मला महत्वाचळे वाटले म्हणून मी 'नव्वदोत्तरी मराठवाड्यातील ग्रामीण साहित्य विशेष संदर्भ: भास्कर चंदनशिव व आसाराम लोमटे' हा विषय संशोधन अभ्यासास घेतला.

**ग्रामीण कथेचे स्वरूप :**

कथा सांगणे, ऐकणे व वाचणे ही मानवाची सहज, स्वाभाविक आवड आहे. कथा हा प्रकार पुरातन काळापासून विकसित होत आला आहे. कथेचा उगम, विकास शोधणे तसे कठीणच आहे. परंतु आदिम काळापासून कथेचे अस्तित्व दिसते. तिचे स्वरूप वेगवेगळे असेल परंतु जगातील विविध भाषांमधील साहित्य हे कथात्मक असल्याचे दिसते. मानवी गरजेतून पिढ्यानपिढ्या सर्व सामाजिक स्तरांमधून कथा वावरत असताना आपल्याला दिसतात. ग्रामीण भागातील चित्रण ग्रामीण कथेच्या माध्यमातून समाजासमोर आलेले आपणास दिसून येते. मराठवाड्यातील अनेक नामवंत कथाकारांनी आपल्या लेखणीतून आपल्या कथेतून शेतकऱ्याचे असे वास्तविक चित्रण मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यामध्ये भास्कर चंदनशिव, आसाराम लोमटे यांनी मराठवाड्यातील शेतकऱ्याचे चित्रण अतिशय प्रभावीपणे मांडले आहे.

**भास्कर चंदनशिव:**

साठोत्तरी ग्रामीण कथेतील महत्त्वाचे ग्रामीण कथाकार म्हणून भास्कर चंदनशिव यांना आपण ओळखतो. त्यांची पहिली कथा 'कुस्ती', अंजली, या नावाच्या वार्षिक अंकांमधून प्रसिद्ध झाली पण त्यांच्या लेखनाला खऱ्या अर्थाने आरंभ व प्रेरणा, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना 'अस्मितादर्श' च्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या नावे एक दलित कथा स्पर्धा मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद येथे आयोजित केली होती. येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कथा स्पर्धेला त्यांनी पाठवलेल्या 'मसनवाटा' या कथेपासून झाली. त्यांचे 'जांवळडव' (1980) 'मरणकळा' (1983) 'अंगारमाती' (1991) 'नवी वारुळ' (1992) इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. या कालखंडातील साहित्याचे नेतृत्व भास्कर चंदनशिव यांच्याकडे द्यावे लागते. 1990 नंतर चा कालखंड हा ग्रामीण साहित्य चळवळीचा कालखंड आहे. कारण या कालखंडातील



Scanned with CamScanner

त्यांची ग्रामीण कथा,नवीन रूप घेऊन सर्व वाङ्मय वैशिष्ट्यांनी प्रकट झालेली दिसते. ग्रामीण भागातील माणसाचे खरेखुरे जीवन उलगडून दाखविण्याचे कार्य भास्कर चंदनशिव यांच्या कथेतून दिसून येत आहे. मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद व बार्शी अशा दुष्काळी भागातील उद्योगधंदे, त्यातून निर्माण झालेल्या मानवी मनाची कोंडी आणि त्यातून लोकांची उध्वस्त झालेले संसार याचे चित्रण त्यांनी केले आहे. ग्रामीण भागात वारंवार घडणाऱ्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देताना सर्वसामान्य माणसाची होणारी ससेहोलपट व त्या माणसाच्या कुटुंबाची होणारी वाताहत भास्कर चंदनशिव आपल्या कथेतून रेखाटतात.

भास्कर चंदनशिव यांची कथा ही मानवी जीवनाच्या व्यथा सांगणारी कथा आहे. मानवी मनाचा शोध घेत, ग्रामीण बोलीच्या माध्यमातून ग्रामीण अनुभव व्यक्त करताना त्यांची कथा दिसते. त्यांच्या कथेमधून ग्रामीण बोली व प्रतिमा द्वारे व्यक्तीच्या जीवनाचे केलेले चित्रण महत्त्वाचे आहे. त्यांचे लेखन अधिक सखोल आणि सूक्ष्म असल्याने त्यांची कथा अधिक धारदार होऊन हृदयाला भिडताना दिसते. त्यांनी ग्रामीण दलित जीवन, कथेतून रेखाटल्या मुळे त्यांची कथा दलित ग्रामीण कथा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत याची अनुभूती ही देते त्यांची कथा ग्रामीण कथेला नवे परिमाण देणारी आहे.

भास्कर चंदनशिव हे अस्सल ग्रामीण कथालेखक आहेत. मराठवाड्यातील शेती व शेतकऱ्याचे त्यांनी समर्थपणे जीवन-दर्शन आपल्या कथेतून घडविले आहे. ते शेतकऱ्यांच्या समस्याकडे संवेदनशीलतेने पाहतात. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक योजना निर्माण होऊनही शेतकरी आहे तिथेच आहे. कर्ज, नापिकी अस्मानी व सुलतानी संकटे दारिद्र्य अशा नानाविधी संकटाने शेतकरी गांजून गेला आहे. भास्कर चंदनशिव वस्तुनिष्ठपणे या सर्वांचा वेध घेताना दिसतात. या संदर्भात त्यांच्या काही कथांचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे.

'अंगारमाती' मधील कथा रूढार्थाने ग्रामीण कथा असली तरी ती केवळ ग्रामीण कथा नाही, तर देशी व्यवस्थेचा तोल सांभाळत पिढ्यानपिढ्या कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कष्टाधिष्टीत वेदना विद्रोहाचा संदर्भ देणारी वास्तवदर्शी कथा साकारलेली आहे.

'हिशोब' ही 'अंगारमाती' मधील पहिली कथा आहे. त्यामध्ये महिपती हा नायक आहे. महिपती हा तात्या चा बी.कॉम बी एड झालेला सुशिक्षित बेकार मुलगा आहे. आपल्या पिढ्यानपिढ्यानी मारवाडी मालकाची गुलामी स्वीकारून सर्वांच्याच आयुष्याचे वाटोळे केले असे ठामपणे मनात ठेवणारा आणि मालकाने केलेल्या लबाडीचा हिशोब मागणारा स्वाभिमानी तरुण आहे. 'तोडणी' कथा ऊसतोडणीची चिठ्ठी मिळूनही ऊसतोडी न झाल्याचे कारण तपासणारी कथा आहे. या कथेमध्ये संघर्ष चित्रीत झालेला दिसून येतो. 'इसकुटा'



Scanned with CamScanner

या कथेत कारखान्याचे लेबर अडवून धरल्याने तात्याला अटक होते हे बेकायदेशीर कृत्य केल्याने तात्या आणि त्यांच्या कुटुंबाला पोलीस धरून नेतात. असे ग्रामीण वास्तव आणि त्यातले राजकारण यात अडकलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे वास्तव विदारक चित्र अशा चित्रणातून वाचकासमोर उभे राहते. 'कोळसं', 'नवी हत्यार', 'खोडा', 'तिढा', 'विळखा','सडणी', 'पोस्टर', 'लाल अंधार', 'मेखमारो', 'आतडी' व 'लाल चिखल' या कथाही शेतकऱ्यांच्या व शेतमालाचा पडत्या भावाचा विचार घेऊन येतात 'मला काय त्याचं' ही दलितांची व्यथा मांडणारी कथा ही मनावर ठसते अशाप्रकारे अंगारमातीमधील कथा या लेखकांच्या आत्मभानाचेही दर्शन घडवताना दिसतात.

आसाराम लोमटे:

मराठवाड्याच्या परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील गुगळी धामणगाव हे आसाराम लोमटे यांचे गाव. या गावावर नेहमीच दुष्काळाचे सावट होते. आसाराम लोमटे यांनी गुगळी धामणगावत प्राथमिक व माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतले आणि उच्च माध्यमिक चे शिक्षण सेलू या गावी घेतले. ते वृत्तपत्रातील रद्दीच्या काही पुरवण्या रविवार काढून त्यातील कथा वाचून उन्हाळ्यातील सुट्टीतील वाचनाची आवड भागवीत असत. वृत्तपत्रातील कथा वाचता वाचताच आपणही असे लिहून पाहावे असा विचार त्यांच्या मनात आला व एका अनुभवावर 'भाकर' नावाची कथा दैनिक मराठवाडा या रविवारच्या पुरवणीत प्रसिद्ध झाली ती कथा छापून आलेली पाहून आसाराम लोमटे यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. व वृत्तपत्राच्या रविवारच्या पुरवणी अंकात कथा लिहायचा त्यांना नाद जडला. पुढे त्यांच्या दिवाळी अंकातून कथा प्रसिद्ध होऊ लागल्या.

इंद्रजीत भालेराव, भास्कर चंदनशिव यांचे व्यक्तिमत्व आसाराम लोमटे यांचे आदर्श होते. दैनिक लोकसत्तेत पत्रकार म्हणून काम करणाऱ्या आसाराम लोमटे यांची कथा समकालीन वास्तवाला भेदून समस्यांच्या मुळांचा शोध घेते. आसाराम लोमटे यांनी २००६ मध्ये 'इडापिडा टळो' हा कथासंग्रह प्रसिद्ध केला तर २०१२ मध्ये 'आलोक' हा कथासंग्रह प्रसिद्ध केला. या दोन्ही कथासंग्रहातील कथा आसाराम लोमटे यांच्या ग्रामीण जीवन अनुभव विश्वाशी निगडीत आहेत.

'इडा पिडा टळो' हा आसाराम लोमटे यांचा पहिला कथासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'इडा पिडा टळो' मधील पहिली कथा 'बेईमान' ही आहे ही कथा तिसरे अपत्य असले तर सरपंच पदावर राहता येणार नाही हा नवा कायदा या कथेचा विषय आहे. 'इडा पिडा टळो' ही कथा शेतकरी आंदोलनात सहभागी झालेल्या एका स्त्रीची



Scanned with CamScanner

कथा आहे. 'जीनगानीचा खेळ' ही कथा कृषी विद्यापीठात रोजंदारीवर काम करणाऱ्या आणि कायम नोकरी मिळवण्यासाठी धडपड करणाऱ्या स्त्रीची कथा आहे.

'निचरा' या कथेत भरभराटीच्या काळात हुकूमशाही चालवणारा आणि म्हातारपणी फार्महाऊसवर आपल्याच मुलांची नजरकैद भोगणारा माजीमंत्री पहावयास मिळतो. चरक, होरपळ अशा विविध कथा आसाराम लोमटे यांनी लिहिल्या आहेत.

आसाराम लोमटे यांचा 'आलोक' हा दुसरा कथासंग्रह आहे. मराठवाड्यातील रजाकराच्या प्रसंगाची आठवण त्यांची 'चिरबंद' ही कथा करून देते. 'ओझं' ही कथा मन हेलावून टाकते कॉलेजात असलेला मास्तर आणि गावाकडे शेती करणारा त्याचा मोठा भाऊ मुरली यांच्यातल्या संबंधावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे. खुदंळण, कुभांड, जीत, वळण अशा विविध कथा त्यांनी यामध्ये चित्रित केल्या आहेत.

सारांश :

अशाप्रकारे नव्वदोत्तरी मराठवाड्यातील ग्रामीण कथेतील चित्रण भास्कर चंदनशिव व आसाराम लोमटे यांनी आपल्या कथेतून मराठवाड्यातील शेतकऱ्याचे वास्तववादी चित्रण मांडण्याचा प्रमाणिक प्रयत्न केलेला पाहावयास मिळतो. त्यांनी लिहिलेल्या कथा वाचकाचे मन हेलावून टाकणाऱ्या आहेत.

**संदर्भ सूची–**

१. भास्कर चंदनशिव, कथासंग्रह, अंगारमाती', १९९१, साकेत प्रकाशन,औरंगाबाद, 'नवी वारुळ' १९९२, अनुपम प्रकाशन, औरंगाबाद.

२. आसाराम लोमटे, कथासंग्रह, 'इडापिडा टळो,' देशमुख आणि कंपनी प्रकाशन,पुणे २००६, 'आलोक', शब्द पब्लिकेशन,२०१२.



Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

October-2021

ISSUE No- (CCCXXII) 322

## २१व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सद्यस्थितीत निर्माण झालेल्या समकालीन सामाजिक समस्या



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Sanjay Surewad
Head, Department of Sociology,
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

Impact Factor - 7.675

ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

**October -2021**

**ISSUE No- (CCCXXII) 322**

## २१ व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सद्यस्थितीत निर्माण झालेल्या 'समकालीन सामाजिक समस्या'

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. D. B. Tanduljekar**
Executive Editors
**I/C Principal**
Yeshwantrao Chavan College, Ambejogai, Dist.- Beed

**Dr. Sanjay Surewad**
Editor
Head, Dept. of Soc.
Yeshwantrao Chavan College, Ambejogai, Dist.- Beed

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 42 | ग्रामीण कथेतून चित्रित होणाऱ्या ग्रामीण समस्या — प्रा. दिलीप ज्ञानोबा भिसे | 145 |
| 43 | दहशतवाद' एक सामाजिक समस्या — प्रा.डॉ. बडुरे राजू सायबा | 148 |
| 44 | भारतातील सार्वजनिक आरोग्य — प्रा. मनीषा महारुद्र गाडवे | 151 |
| 45 | जातीव्यवस्था - एक सामाजिक समस्या — प्रा.डॉ.राजाभाऊ वेंकटराव भगत | 153 |
| 46 | मराठवाड्यातील ग्रामीण कथा साहित्यातील शेतकरी समस्या — श्री. काजगुंडे हनुमंत महादेव | 155 |
| 47 | हवामान बदलाचा परिणाम — प्रा. कांबळे दिलीप बबनराव | 157 |
| 48 | हुंडा प्रथा: एक सामाजिक कलंक — प्रा. डॉ. सुनिता आ टेंगसे | 160 |
| 49 | अण्णा हजारे यांचे राळेगसिध्दीतील सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा अभ्यास — डॉ. मिलिंद बळीरामजी भगत/सावधान वासुदेव उमक | 163 |
| 50 | आत्महत्या : सद्यकालीन एक गंभीर समस्या याचे वास्तव्य आणि सर्वागीण दृष्टीकोनातून अभ्यास — डॉ.सुनंदा ए नाथराव आहेर | 169 |
| 51 | स्त्री - भ्रूणहत्या एक सामाजिक समस्या — प्रा. उगीले माधव उत्तमराव | 175 |
| 52 | कोरोना संसर्गाचा समाजावर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास — प्रा. गंगाधर चव्हाण | 179 |
| 53 | दहशतवाद - राष्ट्रीय सुरक्षेसमोरील - एक सामाजिक समस्या — प्रा.डॉ.प्रशांत प्रभाकरराव सराफ | 182 |
| 54 | हवामान बदलाचे भारतीय कृषि क्षेत्रावरील परिणाम — प्रा.डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव | 186 |
| 55 | भ्रष्ट्राचार : एक ज्वलंत सामाजिक समस्या — परमेश्वर ज्ञानोबा रूपनर | 190 |
| 56 | वाढता दहशतवाद : एक जागतिक समस्या — प्रा. डॉ. माधव माणिकराव मोरे | 192 |
| 57 | जनतेचा राजा छत्रपती शाहू — डॉ.मोरे एम.एम. | 195 |
| 58 | कोरोना काळातील आरोग्य व्यवस्थापन — Dr. Madhukar Vithoba Jadhav | 198 |
| 59 | स्त्री हिंसाचार आणि भारतीय कायदे — श्रीकांत दिनकर तांदळे | 201 |
| 60 | ई-साहित्य आणि त्याची ग्रंथालयातील उपयोगिता — श्री.वाकडे पुरुषोत्तम बाबासाहेब | 204 |
| 61 | ज्ञानाधिष्ठीत समाज आणि ग्रंथालयाची भूमिका — श्री.एस.टी.भोसले | 206 |
| 62 | यशवंतराव चव्हाण एक बहुआयामी व्यक्तिमत्व — श्री किशोर बाबुराव भगत | 208 |
| 63 | मानवी आरोग्य पाणी नैसर्गिक पर्यावरण — डॉ संतोष बाबुराव कोकीळ | 210 |
| 64 | स्त्रियांच्या श्रमाचे अर्थव्यवस्थेतील शोषण — Dr. Pragati Harle Kukade | 213 |


Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO322 (CC CCCXXII)
ISSN : 2278-9308
October, 2021

# मराठवाड्यातील ग्रामीण कथा साहित्यातील शेतकरी समस्या

श्री. काजगुंडे हनुमंत महादेव
एम.ए. मराठी, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई.
मो. ९५६११४०७४२, vishalkajgunde@gmail.com

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यामध्ये विविध लेखकांनी कथा, कविता, कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनावर, शेतकरी जीवनावर मोठ्या प्रमाणावर लेखन केले आहे. यामध्ये मराठवाड्यातील लेखकाचे योगदान लक्षणीय आहे. या लेखकांनी ग्रामीण जीवनाच्या परिस्थितीचे, शेतकऱ्यांचे शेती संदर्भात घटकांचे वास्तव चित्रण केल्याचे पहावयास मिळते. सोबतच शेती विषयक ग्रामीण समस्या चित्रित करणे या ग्रामीण साहित्याचे मुख्य ध्येय असल्याचे जाणवते. 1990 नंतर प्रामुख्याने ग्रामीण साहित्यात ग्रामीण जाणिवा अधिक प्रभावीपणे वास्तव स्वरूपात चित्रित झाल्या आहेत. जसे की, शेतकऱ्याचे कष्टमय जगणे, दारिद्र्य जीवन, ग्रामीण माणसाची गुंतागुंत, आंदोलने, शासनाचे उदासीन धोरण, जागतिकीकरणाचा प्रभाव इत्यादी मुळे ग्रामीण कथेचे स्वरूप व्यापक झाले असल्याचे जाणवते.

यात प्रामुख्याने वासुदेव मुलाटे, नागनाथ कोतापल्ले, भास्कर बडे, शंकर देशमुख, भारत काळे, अंबादास केदार, विजय सावंत, उमेश मोहिते ललिता गादगे, प्रा. अर्जुन डोईफोडे, विजय जाधव आदी लेखकांनी ग्रामीण जीवनातील परिवर्तने, प्रश्न, ज्वलंत समस्या प्रामाणिकपणे व पोटतिडकीने मांडल्या आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील ग्रामीण कथेला नवा आयाम आकारास आल्याचे स्पष्ट होते. संशोधनासाठी घेतलेल्या विषयाचे स्वरूप मराठवाड्यातील ग्रामीण कथा साहित्यातील शेतकरी समस्या असा आहे. मराठवाड्यातील इतर विभागापेक्षा मराठवाडा हा भाग अतिशय दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. त्यामुळे इथला शेतकरी व शेती संदर्भातील सर्व घटक कायम समस्याग्रस्त असतात.

**मराठवाड्यातील ग्रामीण कथा साहित्यातील शेतकरी समस्या -**

1991 पासून शेती क्षेत्र अनेक समस्यांना सामोरे जात आहे. उदा. शेतकऱ्यावरील वाढते कर्ज, महागडे यंत्र, बियाणांचे वाढते भाव, पाणी पुरवठ्यातील अनियमितता, शेतीतील उत्पन्नाचा अनिश्चित भाग, पर्यावरणातील आणि जागतिक बाजारपेठेतील बदल, शेतीचे होणारे तुकडे, बँकिंग क्षेत्राची अनियमितता, कृषी कर्ज देणे, खाजगी सावकाराकडून, खाजगी पतसंस्था व दलालाकडून व योग्य शासकीय धोरण या सर्व बाबींचा शेती आणि शेतकऱ्यावर प्रतिकूल परिणाम होऊन शेतकरी आत्महत्या करण्यास सुरुवात झाली. भारतीय कृषी क्षेत्रासमोर अनेक समस्या उभ्या आहेत. त्यात शेतकऱ्यांची आत्महत्या ही एक प्रमुख समस्या आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या भारतीय अर्थव्यवस्थे समोर ज्वलंत समस्या आहे. 1991 च्या जागतिकीकरणामुळे ही समस्या तीव्र स्वरूप धारण करत आहे. शेतकरी ही शेती धारण करणारी व्यक्ती असते, शेती कसणारा शेतकरी. शेतकरी हा ग्रामव्यवस्था आणि कृषी समाज रचनांचा कणा आहे **'गावगाडा'** कार त्रि. ना. अत्रे गाव वसविण्याचे आणि काळी वहितीला आणण्याचे श्रेय कुणबीकीला देतात. त्यांच्या मते 'खेडणे' म्हणजे जमिनीची मशागत करणे होय. आणि **'खेडूत'** म्हणजे जमीन कसणारा. असा प्रत्यक्ष जमीन कसणारा मालक असा तो मिरासदार असो वा बटाईदार प्रत्यक्ष जमीन कसणारा म्हणजे शेतकरी होय.

शेती करताना शेतकऱ्याला बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, बाजारपेठेतील बाजार भावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक इत्यादी कडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीतील होणारे शासकीय बदल अशा अचानक येणाऱ्या अनेक संकटांचा सामना करावा लागतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजार रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो, पण त्याच्या कष्टाला दरवेळी फळ मिळतेच असे नाही, तसेच शेतकऱ्यांच्या समोर हमीभावाची समस्या आहे. सामाजिक प्रश्नाने ग्रामीण जीवनाची कोंडी झाली आहे. खोट्या प्रतिष्ठा, जातीची अस्थिरता, कमालीचा स्वार्थ, व्यक्तिगत अहंकार यातून सामाजिक प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत जातात. यासंबंधीची वास्तव चित्रण अर्जुन डोईफोडे या कथाकारांनी **'उसतोडणी'** या कथासंग्रहातील बरड, गाव, इसार, वाटणी, चटका, प्रार्थना, उधारी, इनाम या कथांमधून मांडले आहे. पुराचे पाणी घरात घुसल्यानंतर ही जातीची प्रतिष्ठा महत्त्वाची आहे. बर्डी, या कथेतून हे चित्रं आले आहे. दलित विरुद्ध सवर्ण असा हा संघर्ष ही कथा चित्रित करते.

Scanned with CamScanner

ग्रामीण माणसे जगण्यासाठी संघर्ष करतात. त्यांच्या वर्तुळात त्यांचे जगणे चाललेले असते. संघर्ष उत्कटपणे करणारे ठरतात. त्यामुळे त्यांच्या जगण्यातील बळ संपते. ते हतबल होतात. सहनशक्ती संपली की मरतात. कुढे उघड्यावर पडतात. **विजय जाधव** यांच्या कथेतून अशा माणसाच्या मृत्यूचे चित्रण अधिक आहे. माणूस मेला की अन्य माणसे हळहळतात. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होतात. नंतर त्यांचे जगणे पूर्ववत होते. त्या घरातील कर्ता माणूस गेला ते कुटुंब अगतिक, असह्य स्थितीत जगत असते. त्यांचे अन्य कुणाला काही वाटत नाही वाईट वाटले तरी, ते या कुटुंबासाठी काही करू शकत नाहीत. त्यांची स्थिती साधारण असते.

ग्राम जीवनातील दारिद्र्य आणि दारिद्र्यातून पुन्हा भर घालणारा दुष्काळ, यासंबंधीचे चित्रण विजय जाधव यांच्या कथांतून आले आहे. मराठवाडा आणि दुष्काळ यांचे सख्य सर्वश्रुत आहे. शेतीत भागत नाही, म्हणून अन्य व्यवसाय शोधणारी माणसे आहेत, शेती नसणारे लोक शेतमजूरी पेक्षा अन्य व्यवसाय अधिक करतात. हा अनुभव अलीकडे अधिकच झाला आहे. हे व्यवसाय फार कष्टाचे आणि कमी फायद्याचे आहेत, त्यासाठी लागणारे भांडवल ही त्यांच्याजवळ आहे. व्यवसाय करणारे आणि व्यवसायासाठीचे मजूर यात फारसा फरक नाही. भांडवल उभारणीसाठी जमीन विकण्याचा मार्ग एकमेव मार्ग त्यांच्याकडे असतो, त्याचा अर्थ एकच आहे की, व्यवसायात अपयश आले की त्यांनीही मजूर व्हायचे. फार तर शहरात कंपनीचे रोजंदारीचे काम व्हायचे ते लागणारे कोणतेही कौशल्य त्यांच्याकडे नसल्याने, अकुशल कामगार म्हणून हमाली कामे करायची, यासंबंधीचे भयावह वास्तव चित्रण विजय जाधव यांची कथा चित्रित करते. एकंदरीत विजय जाधव यांची कथा ग्रामीण माणसाच्या जगण्याची कथा आहे. तेथील स्त्री पुरुष शारीरिक शोषणाचे बळी आहेत. माणसाच्या नानाविध प्रवृत्तीचे दर्शन विजय जाधव यांची **'दाखला'** हा कथासंग्रह घडवितो.

निसर्ग पूर्णतः बदलून गेला आहे. कधी धो-धो पाऊस पडून तर कधी थंडीच्या लाटेने शेतीची मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्याचे आकारमान कमी कमी होत आहे, सतत दोन दिवस संततधार पाऊस पडला तर नदीपात्रात पाणी मावत नाही. काठावरच्या लोकवस्तीत नदीचं पाणी शिरून संसाराची नुकसान होत आहे यामुळे खेड्यातील लोकांचे जीवनात नैराश्य निर्माण झाले आहे. 1972 पासून मराठवाड्यात सातत्याने दुष्काळ पडत आहे कधी ओला तर कधी कोरडा या सततच्या दुष्काळांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले जात आहे. एकंदरीत ग्रामीण जीवन गुंतागुंतीचे बनत आहे या गुंतागुंतीच्या जीवनामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

**प्रा. अर्जुन डोईफोडे** यांचा 'ऊसतोडणी' हा पहिला कथासंग्रह. या पहिल्याच कथासंग्रहात त्यांनी शेतकऱ्यांची निगडीत असलेल्या सर्व प्रश्नांना हात घातला आहे. त्यानंतर गावातील राजकारण, दुष्काळ, नोकरीसाठी शेतकऱ्यांची त्यांच्या मुलासाठी ची परवड, असो किंवा नोकरीला लागल्यानंतर मुलांवर होणाऱ्या हाल-अपेष्टा असोत, त्यांना अत्यंत खुबीने मांडलेले आहेत.

कपाशी हे नगदी पीक शेतकऱ्यांना फार जवळचे वाटते, पण या कपाशीचा खर्च उत्पन्नापेक्षा कधीकधी अधिक होतो. त्याच्या आधुनिक वानावर कधी फकडी, तर कधी लाल्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. मागील बऱ्याच वर्षांपासून शासन या लाल्या चे अनुदान शेतकऱ्यांना देत आहे. पण ते अनुदान भीक नको पण, कुत्रा आवर, अशी म्हणण्याची वेळ शेतकऱ्याचे ते दोन रुपये घेण्याला ही ही शासनातील मंडळी मागेपुढे पाहत नाहीत. व त्या दोन रुपयांसाठी होणारी शेतकऱ्यांची ससेहोलपट **'लाल्या'** कथेतून अतिशय उत्तम पणे मांडण्यात **प्रा. अर्जुन डोईफोडे** यशस्वी झालेले आहेत.

शेतकऱ्यांच्या जीवनात सुख नावाची गोष्टच त्यांच्या नियतीने लिहून ठेवलेली नसते. त्यांच्या घरात कोणतीही वस्तू चांगली नसते. आहेत त्या वस्तूवर तो आपले जीवन दखवत असतो. वायरचे तुकडे - तुकडे जोडून आकडा टाकून आपल्या घरात उजेड करण्याच्या नादात स्वतःच्या संसारा बरोबर दोन मुलांची राख पाहण्याची वेळ त्या शेतकरवर येते ही अतिशय मनाला भिडणारी कथा. **'आकडा'** मधून साकारली आहे. अशा विविध कथांमधून, शेतकऱ्याच्या समस्याला उलगडा थोडक्यात येथे मांडण्यात आला आहे.

संदर्भ सूची –

१. अर्जुन डोईफोडे, 'उसतोडणी', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
२. विजय जाधव, 'दाखला', शब्द पब्लिशिंग हाउस, सिडको, औरंगाबाद.
३. कदम आनंद, 'गावाकडचे गार्डी', प्रचीत प्रकाशन, नांदेड, प्र. आ. २००६.
४. रा. र. बोराडे, 'बानवळा', प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्र. आ. २००३.

Scanned with CamScanner

ग्रामीण माणसे जगण्यासाठी संघर्ष करतात. त्यांच्या वर्तुळात त्यांचे जगणे चाललेले असते. संघर्ष उपस्फोट
करणारे ठरतात. त्यामुळे त्यांच्या जगण्यातील बळ संपते. ते हतबल होतात. सहनशक्ती संपली की मरतात. कुटुंब
उघड्यावर पडतात. **विजय जाधव** यांच्या कथेतून अशा माणसाच्या मृत्यूचे चित्रण अधिक आहे. माणूस मेला की
अन्य माणसे हळहळतात. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होतात. नंतर त्यांचे जगणे पूर्ववत होते . त्या
घरातील कर्ता माणूस गेला ते कुटुंब अगतिक, असह्य स्थितीत जगत असते. त्यांचे अन्य कुणाला काही वाटत नाही
वाईट वाटले तरी, ते या कुटुंबासाठी काही करू शकत नाहीत. त्यांची स्थिती साधारण असते.

ग्राम जीवनातील दारिद्र्य आणि दारिद्र्यातून पुन्हा भर घालणारा दुष्काळ, यासंबंधीचे चित्रण विजय जाधव
यांच्या कथांतून आले आहे. मराठवाडा आणि दुष्काळ यांचे सख्य सर्वश्रुत आहे. शेतीत भागत नाही, म्हणून अन्य
व्यवसाय शोधणारी माणसे आहेत, शेती नसणारे लोक शेतमजूरी पेक्षा अन्य व्यवसाय अधिक करतात. हा अनुभव
अलीकडे अधिकच झाला आहे. हे व्यवसाय फार कष्टाचे आणि कमी फायद्याचे आहेत, त्यासाठी लागणारे भांडवल ही
त्यांच्याजवळ आहे. व्यवसाय करणारे आणि व्यवसायासाठीचे मजूर यात फारसा फरक नाही, भांडवल उभारणीसाठी
जमीन विकण्याचा मार्ग एकमेव मार्ग त्यांच्याकडे असतो, त्याचा अर्थ एकच आहे की, व्यवसायात अपयश आले की
त्यांनीही मजूर व्हायचे. फार तर शहरात कंपनीचे रोजंदारीचे काम व्हायचे ते लागणारे कोणतेही कौशल्य त्यांच्याकडे
नसल्याने, अकुशल कामगार म्हणून हमाली कामे करायची, यासंबंधीचे भयावह वास्तव चित्रण विजय जाधव यांची
कथा चित्रित करते. एकंदरीत विजय जाधव यांची कथा ग्रामीण माणसाच्या जगण्याची कथा आहे. तेथील स्त्री पुरुष
शारीरिक शोषणाचे बळी आहेत. माणसाच्या नानाविध प्रवृत्तीचे दर्शन विजय जाधव यांची **'दाखला'** हा कथासंग्रह
घडवितो.

निसर्ग पूर्णतः बदलून गेला आहे. कधी धो-धो पाऊस पडून तर कधी थंडीच्या लाटेने शेतीची मोठ्या
प्रमाणावर नुकसान होत आहे. त्याचे आकारमान कमी कमी होत आहे, सतत दोन दिवस संततधार पाऊस पडला तर
नदीपात्रात पाणी मावत नाही. काठावरच्या लोकवस्तीत नदीचं पाणी शिरून संसाराची नुकसान होत आहे यामुळे
खेड्यातील लोकांचे जीवनात नैराश्य निर्माण झाले आहे. 1972 पासून मराठवाड्यात सातत्याने दुष्काळ पडत आहे
कधी ओला तर कधी कोरडा या सततच्या दुष्काळांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले जात आहे. एकंदरीत ग्रामीण जीवन
गुंतागुंतीचे बनत आहे या गुंतागुंतीच्या जीवनामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

**प्रा. अर्जुन डोईफोडे** यांचा 'ऊसतोडणी' हा पहिला कथासंग्रह. या पहिल्याच कथासंग्रहात त्यांनी शेतकऱ्यांची
निगडीत असलेल्या सर्व प्रश्नांना हात घातला आहे. त्यानंतर गावातील राजकारण, दुष्काळ, नोकरीसाठी शेतकऱ्यांची
त्यांच्या मुलासाठी ची परवड, असो किंवा नोकरीला लागल्यानंतर मुलांवर होणाऱ्या हाल-अपेष्टा असोत, त्यांना
अत्यंत खुबीने मांडलेले आहेत.

कपाशी हे नगदी पीक शेतकऱ्यांना फार जवळचे वाटते, पण या कपाशीचा खर्च उत्पन्नापेक्षा कधीकधी
अधिक होतो. त्याच्या आधुनिक वानावर कधी फकडी, तर कधी लाल्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. मागील वर्ष्याच
वर्षापासून शासन या लाल्या चे अनुदान शेतकऱ्यांना देत आहे. पण ते अनुदान 'भीक नको पण, कुत्रा आवर', अशी
म्हणण्याची वेळ शेतकऱ्याचे ते दोन रुपये घेण्याला ही ही शासनातील मंडळी मागेपुढे पाहत नाहीत. व त्या दोन
रुपयांसाठी होणारी शेतकऱ्यांची ससेहोलपट **'लाल्या'** कथेतून अतिशय उत्तम पणे मांडण्यात **प्रा. अर्जुन डोईफोडे**
यशस्वी झालेले आहेत.

शेतकऱ्यांच्या जीवनात सुख नावाची गोष्टच त्यांच्या नियतीने लिहून ठेवलेली नसते. त्यांच्या घरात
कोणतीही वस्तू चांगली नसते. आहेत त्या वस्तूवर तो आपले जीवन दखवत असतो. वायरचे तुकडे - तुकडे जोडून
आकडा टाकून आपल्या घरात उजेड करण्याच्या नादात स्वतःच्या संसारा बरोबर दोन मुलांची राख पाहण्याची वेळ
त्या शेतकरवर येते ही अतिशय मनाला भिडणारी कथा, **'आकडा'** मधून साकारली आहे. अशा विविध कथामधून,
शेतकऱ्याच्या समस्याला उलगडा थोडक्यात येथे मांडण्यात आला आहे.

संदर्भ सूची –

१. अर्जुन डोईफोडे, 'उसतोडणी', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
२. विजय जाधव, 'दाखला', शब्द पब्लिशिंग हाउस, सिडको, औरंगाबाद.
३. कदम आनंद, 'गावाकडचे गाडी', प्रचीत प्रकाशन, नांदेड, प्र. आ. २००६.
४. रा. र. बोराडे, 'वानवळा', प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्र. आ. २००३.

Scanned with CamScanner